**वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे/अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा पुनर्विलोकन करुन मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याबाबत एकत्रित कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एलपीएल-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० जून, २०१९

वाचा :-

१. शा.प.क्र.एसआरव्ही-१०७५/X, दि.०१.१०.१९७५.
२. शा.प.क्र.एसआरसी-१०७५/XV, दि. ०६.०१.१९७६.
३. शा. प. क्र.एसआरसी १०७६/५८०/XV, दि.०८.०४.१९७६.
४. शा. प. क्र.एसआरसी १०७६/५८०/XV, दि.१५.११.१९७६.
५. शा. प. क्र.एसआरसी १०७९/३०३/XV, दि. २४.१०.१९७९.
६. शा.प.क्र.एसआरसी-१०८०/XV, दि. ०३.०६.१९८०.
७. शा.प.क्र.विपुस१०८४/पंधरा, दि. ०२.०४.१९८५.
८. शा.प.क्र.एसआरसी-१०८६/३१/(२)/पंधरा-३, दि.०४.०३.१९८६.
९. शा.प.क्र.एसआरसी-१०८५/१०२९/४३/१५, दि. १२.०५.१९८६.
१०. शा.प.क्र.एसआरसी-१०८५/सीआर-१/१५, दि. ०८.०६.१९८७.
११. शा. प. क्र.संकीर्ण १०८९/प्र.क्र.४१/XV, दि. १५.०५.१९९०.
१२. शा. प. क्र. एसआरसी १०८८/प्र.क्र.५/पंधरा,दि.२८.०८.१९९०.
१३. शा.प.क्र.एसआरसी-१०८९/प्र.क्र.३३/८९/१५, दि. १४.०१.१९९२.
१४. शा.प.क्र.एसआरसी-१०९३/प्र.क्र.९/९३/१५, दि. १७.०७.१९९३.
१५.शा.प.क्र.विपुस-१०९२/प्र.क्र.२०/९२/१५, दि.१८.१०.१९९३.
१६.शा. नि. क्र. विपुस१०९६/प्र.क्र.१२८/९६/१५, दि.२९.११.१९९६.
१७.शा.प.क्र. विपुस १०९७/प्र.क्र.१३६/९७/१५, दि. २५.०९.१९९८.
१८.शा.प.क्र. विपुस १०९९/प्र.क्र.५८/९९/१५, दि. १६.०९.१९९९.
१९.शा.प.क्र. विपुस १०९८/६९५/प्र.क्र.६८/९८/१५, दि. १४.१२.१९९९.
२०.शा.नि.क्र.विपुस-१०९९/प्र.क्र.५२/९९/१५, दि. २१.०३.२०००.
२१.शा.नि.क्र.विपुस-१००२/प्र.क्र.१४८/२००२/१५, दि. २२.०९.२००३.
२२.शा.नि.क्र.विपुस-१००९/प्र.क्र.७८/०९/१५, दि. २९.०३.२०१०.
२३.शा.नि.क्र.विपुस-१००८/प्र.क्र.५/०८/१५, दि. ०४.०८.२०१०.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम १०(४) व नियम ६५ अनुसार सार्वजनिक हितास्तव अकार्यक्षम व संशयास्पद सचोटीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना, वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी, त्यांचे सेवा पुनर्विलोकन करुन त्यांना शासन सेवेतून मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे असे शासनाचे धोरण आहे.

शासनाच्या उपरोक्त धोरणाच्या अनुषंगाने सेवा पुनर्विलोकनासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णय / शासन परिपत्रके निर्गमित करण्यात आली आहेत. सदर शासन निर्णय / परिपत्रके यांचे एकत्रिकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने आता सेवापुनर्विलोकनासंदर्भातील उपरोक्त संदर्भांकित क्र. १ ते २३ येथील शासन निर्णय / परिपत्रके अधिक्रमित करण्यात येऊन पुनर्विलोकनासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे एकत्रित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम १० (४) व नियम ६५ मधील तरतूदीनुसार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांची शासन सेवा पुढे चालू ठेवण्याची पात्रापात्रता आजमाविण्यासाठी विहित निकषांच्या आधारे त्यांचे पुनर्विलोकन करुन, सुयोग्य व कार्यक्षम अधिकारी / कर्मचारी यांनाच **लोकहितास्तव** शासन सेवेत पुढे चालू ठेवावे व अकार्यक्षम तसेच संशयास्पद सचोटी असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्यात यावे.

**२. सेवा पुनर्विलोकनासंबंधी कार्यपध्दती व सर्वसाधारण सूचनाः-**

१) शासन सेवेत वयाच्या ३५ व्या वर्षापूर्वी आलेल्या गट-अ व गट-ब च्या राजपत्रित अधिकाऱ्यांचे त्यांच्या वयाची ५० वर्षे पूर्ण होतेवेळी किंवा त्यांच्या अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होते वेळी यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी एकदाच पुनर्विलोकन करण्यात यावे. तसेच वयाच्या ३५ व्या वर्षानंतर सेवेत दाखल झालेल्या राजपत्रित अधिकाऱ्यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी पुनर्विलोकन करण्यात यावे. गट-ब अराजपत्रित, गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या वयाच्या ५५ व्या वर्षी किंवा त्यांच्या अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा पुनर्विलोकन करण्यात यावे.

२) त्याकरिता प्रत्येक कॅलेंडर वर्षात दिनांक १ ऑगस्ट रोजी वयाची ४९/५४ वर्षे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची सूची, गट-अ व गट-ब (राजपत्रित) चे बाबतीत संवर्ग नियंत्रण करणाऱ्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने तसेच गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड च्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संबंधित प्रशासकीय कार्यालयाने तयार करावी.

३) उपरोक्त सूचीतील अधिकारी/कर्मचारी यांच्या त्या वर्षीच्या ३१ मार्च पर्यंतच्या गोपनीय अहवाल नस्त्या परिपूर्ण असतील याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

४) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा पुनर्विलोकन करण्याकरिता विभागीय तसेच विशेष पुनर्विलोकन समित्यांची रचना परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्येक प्रशासकीय विभागाने तसेच क्षेत्रिय कार्यालये यांनी विभागीय पुनर्विलोकन समित्यांची रचना करावी. सदर समितीने पुनर्विलोकनासंदर्भातील कामकाजास प्रत्येक वर्षी

माहे ऑगस्ट मध्ये सुरुवात करावी आणि त्या वर्षाच्या शेवटीपर्यंत (३१ डिसेंबर) समितीने कामकाज पूर्ण करावे.

५) पुनर्विलोकन करताना विचारात घ्यावयाचे निकष -

| वर्गीकरण | शासन सेवा पुढे सुरु ठेवण्याकरिता पात्रापात्रता आजमाविण्यासाठी निकष |
|---|---|
| गट-अ, गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) अधिकारी आणि गट-क कर्मचारी | **शारीरिक क्षमता/प्रकृतिमान, निर्विवाद सचोटी व चांगल्यापेक्षा कमी नाही** असा गोपनीय अभिलेख (सन २०१७-१८ पासूनच्या कार्यमूल्यमापन अहवालांचे गुणांकन ४ किंवा त्यापेक्षा जास्त असावे.) |
| गट-ड कर्मचारी | **शारीरिक क्षमता/प्रकृतिमान, निर्विवाद सचोटी व प्रतिकूल नसतील असे वैयक्तिक नस्तीमधील अभिप्राय** (गोपनीय अभिलेख) |

**टिप** - निर्विवाद सचोटी, शारिरिक क्षमता/प्रकृतीमान यांची नोंद वार्षिक गोपनीय अभिलेखात असते ती पहावी.

६) पुनर्विलोकन समितीपुढे सादर करण्यासाठी प्रकरणे पाठवितांना मंत्रालयीन विभागांनी संबंधितांचे अद्यावत गोपनीय अहवाल /कार्यमूल्यमापन अहवाल प्रथम उपलब्ध करुन घ्यावेत व मगच विहीत प्रपत्रातील माहिती (**परिशिष्ट-ब**) व गोपनीय अहवालांसह पुनर्विलोकनाचे प्रस्ताव पुनर्विलोकन समितीपुढे पाठविण्याची खबरदारी घ्यावी.

७) पुनर्विलोकनासाठी विचारात घ्यावयाचा गोपनीय अहवालाचा कालावधी यासंदर्भात सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्र.विपुस-१०९७/प्र.क्र.१३६/९७/१५, दिनांक १९ जून,१९९८ मधील तरतूदी विचारात घ्याव्यात. त्यानुसार पुनर्विलोकन प्रकरणांचा विचार करताना संबंधितांचे संपूर्ण सेवा कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात यावेत. मात्र पुनर्विलोकनाच्या विचाराधीन कालावधीतील मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालावर भर देऊन त्याआधारे पात्रापात्रतेचा निर्णय घ्यावा.

८) शिस्तभंगाची कार्यवाही प्रलंबित असलेल्या शासकीय सेवकांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करताना **परिशिष्ट-क** नुसार कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

९) पुनर्विलोकन समितीच्या शिफारशीनुसार जे अधिकारी/कर्मचारी हे सेवेत ठेवण्यास पात्र / अपात्र ठरतील अशा अधिकारी/कर्मचारी यांची शिफारस अंतिमत: निर्णयासाठी **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित समुचित प्राधिकाऱ्यास सादर करावी.

१०) पुनर्विलोकनाअंती जे शासकीय अधिकारी/कर्मचारी शासन सेवेत ठेवण्यास निर्विवादपणे अपात्र ठरतील त्यांना मुदतपूर्व सेवानिवृत्तीची तीन महिन्यांची नोटीस देण्यात यावी.

११) शासकीय सेवकाने मुदतपूर्व सेवानिवृत्तीची ३ महिन्याची नोटीस अथवा नोटीस ऐवजी ज्या कालावधीचे वेतन अथवा धनादेशासह मुदतपूर्व सेवानिवृत्तीचे आदेश स्विकारण्यास नकार दिल्यास त्याचा नकार दोन राजपत्रित अधिकाऱ्यांच्या समक्ष नोंदवून घ्यावा. अशा वेळी नोटीस किंवा आदेशाची प्रत पोच देय डाकेने संबंधिताच्या निवासी पत्त्यावर पाठवावी. नोटीस किंवा आदेशाची प्रत पाठवितांना संबंधिताने अमुक व्यक्तीकडे अमुक दिनांकास त्यास दिलेली नोटीस / आदेश स्वीकृत करण्यास नकार दिल्याने अशा परिस्थितीत या नोटीस / आदेशाची प्रत पोच देय डाकेने पाठविण्यात येत आहे याबाबतचे स्वतंत्र पत्र सोबत पाठवावे. अशा प्रकरणी त्या सेवकाने सदर नोटीस स्विकारण्यास नकार दिल्यास दुसऱ्या दिवशीच्या मध्यान्हपूर्व पासून ही नोटीस लागू झाल्याचे समजण्यात येईल.

१२) पुनर्विलोकन समितीच्या आधारावरील शासनाचा/विभागप्रमुखांचा प्रत्येक निर्णय संबंधित अधिकाऱ्याला/कर्मचाऱ्याला कळविण्याची आवश्यकता नाही. शासनाचा/ विभागप्रमुखांचा निर्णय "एखाद्या अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास सेवेतून निवृत्त करावे" असा असल्यास त्याला मुदतपूर्व सेवानिवृत्तीची ३ महिन्यांची नोटीस दिली जाते. तसेच, सेवेत ठेवण्याबद्दलचा निर्णयदेखील संबंधित अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास कळवून अशा निर्णयाची प्रत संबंधित अधिकाऱ्याच्या /कर्मचाऱ्याच्या गोपनीय अभिलेखावर ठेवण्यात यावी.

१३) शासकीय अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास गैरवर्तणूकीच्या कारणास्तव विभागीय चौकशी सुरु करुन सक्तीने सेवानिवृत्त करता येते. तथापि जवळचा मार्ग अवलंबिण्याकरिता म्हणून केवळ त्यास सेवापुनर्विलोकनाद्वारे मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्यात येऊ नये.

१४) कर्मचारी वर्ग अतिरिक्त झाला म्हणून किंवा काटकसर म्हणून सेवेतून कमी करण्यासंबंधीच्या नियमांचे/आदेशांचे अनुपालन न करता केवळ अशा कारणास्तव शासकीय सेवकास मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्यात येऊ नये.

## ३. सेवा पुनर्विलोकनानंतर मुदतपूर्व सेवानिवृत्तीच्या निर्णयाविरुध्दच्या अभिवेदनासंदर्भात कार्यपध्दती व सर्वसाधारण सूचना -

१) पुनर्विलोकन करुन मुदतपूर्व सेवानिवृत्तीचा निर्णय झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अभिवेदन सादर करावयाचे असल्यास त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्तीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यात अभिवेदन सादर करावे. सदर एक महिन्याची मुदत संपल्यानंतर सादर करण्यात येणाऱ्या अभिवेदनावर विचार करण्यात येवू नये.

२) **अभिवेदन कोणास सादर करावे -**

**अ)** गट-अ (सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन ७६०० व त्यावरील) यामधील अधिकारी यांनी अभिवेदन संबंधित प्रशासकीय विभागामार्फत मुख्य सचिवांना

सादर करावे. संबंधित प्रशासकीय विभागांनी सदर अभिवेदन सामान्य प्रशासन विभागामार्फत अभिवेदन समितीस (यथास्थित आस्थापना मंडळ क्र. १/आस्थापना मंडळ क्र. २) (परिशिष्ट-ड नुसार) सादर करावे.

**ब)** गट-अ (कनिष्ठ वेतनश्रेणी) (सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेडवेतन ७६०० पेक्षा कमी), गट-ब (राजपत्रित) अधिकारी, तसेच मंत्रालयीन विभागांतील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी यांनी अभिवेदन संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांना सादर करावे. सदर अभिवेदन संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या विभागीय अभिवेदन समितीसमोर सादर करावे.

**क)** मंत्रालयीन विभागांव्यतिरीक्त क्षेत्रिय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी यांनी अभिवेदन संबंधित कार्यालयामार्फत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना सादर करावे. संबंधित कार्यालयाने सदर अभिवेदन क्षेत्रिय स्तरावरील संबंधित अभिवेदन समितीस सादर करावे.

३) सेवापुनर्विलोकनाअंती सेवा पुढे चालू ठेवण्यास निर्विवादपणे अपात्र ठरलेल्या नोटीस बजावण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या अभिवेदनावर विचार करण्याकरीता **परिशिष्ट-ड** मध्ये नमूद केल्यानुसार अभिवेदन समित्यांची रचना करण्यात यावी.

४) शासकीय अधिकारी/कर्मचा-यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्तीविरुध्द सादर केलेली अभिवेदने गट-अ च्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत अभिवेदन समितीसमोर सादर करण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविताना सदर अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अभिवेदनाच्या व सोबतच्या **परिशिष्ट-ई** मधील माहितीच्या १० प्रती प्रस्तावासोबत पाठविण्यात याव्यात. गट-ब/गट-क च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांबाबत संबंधित अभिवेदन समितीसमोर प्रस्ताव पाठविताना सदर अभिवेदनाच्या व सोबतच्या **परिशिष्ट-ई** मधील माहितीच्या दोन प्रती प्रस्तावासोबत पाठविण्यात याव्यात.

५) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पुनर्विलोकनासाठी विभागीय पुनर्विलोकन समितीने विचारात घेतलेला गोपनीय अहवालांचा अभिलेखच अभिवेदन समित्यांनी विचारात घ्यावा.

६) अधिकारी/कर्मचारी यांच्या मुदतपूर्व सेवानिवृत्ती विरुध्दच्या अभिवेदनावर शक्यतो मुदतपूर्व सेवानिवृत्तीच्या तीन (३) महिन्याच्या नोटिसीच्या मुदतीत निर्णय घेण्याचा सर्व संबंधितांनी प्रयत्न करावा.

७) जर अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अभिवेदनावर ३ महिन्याच्या कालावधीत निर्णय होऊ शकला नाही तर अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना, अभिवेदनावर होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहुन, ३ महिन्यांच्या पुढे सेवेत राहू द्यावे व संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांना तसे कळवावे. त्यासाठी लागणारा ज्ञापनाचा विहीत नमुना **(परिशिष्ट-फ)** सोबत जोडला आहे.

८) अभिवेदन समितीची शिफारस अंतिम निर्णयासाठी **परिशिष्ट-ड** मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित समुचित प्राधिकाऱ्यास सादर करावी.

९) तीन महिन्याच्या नोटिशीची मुदत संपल्यावर अभिवेदन फेटाळण्याचा निर्णय झाल्यास त्यानंतर सत्वर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्त करण्यात यावे. असे करताना त्यांना पुन्हा ३ महिन्यांची नोटिस देण्याची आवश्यकता नाही. परंतु अभिवेदनावरचा निर्णय त्यांना कळविणे आवश्यक आहे.

१०) मुदतपूर्व सेवानिवृत्त केलेल्या अधिकाऱ्याला/कर्मचाऱ्याला अभिवेदन समितीने गुणवत्तेनुसार केलेल्या शिफारशींच्या आधारे शासनाने परत सेवेत रुजू करुन घेतल्यास अशा अधिकाऱ्यांचा/ कर्मचाऱ्यांचा खंडित कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून गणण्यात यावा.

११) ज्या अधिका-यांना/कर्मचाऱ्यांना ३ महिन्यांच्या नोटिसी ऐवजी ३ महिन्यांचा पगार देऊन मुदतपूर्व सेवानिवृत्त केले असेल त्यांना अभिवेदन समितीच्या शिफारशींनुसार पुन्हा सेवेत रुजू करून घेतल्यास त्यांचा खंडीत कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून घोषित करताना ३ महिन्यांच्या नोटिसी ऐवजी त्यांना देण्यात आलेले ३ महिन्यांचे वेतन कर्तव्य कालावधी पोटी देय ठरणाऱ्या वेतनातून समायोजित करण्यात यावे.

१२) अकार्यक्षमतेच्या कारणावरुन जर मुदतपूर्व सेवानिवृत्त केले असेल आणि अभिवेदनावर विचार होऊन संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यावर अन्याय झाला असे जर स्पष्ट होत असेल आणि त्यास पुन्हा सेवेत रुजू करुन घेतल्यास किंवा मुदतपूर्व सेवानिवृत्त केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्याने न्यायालयात याचिका दाखल केल्यास आणि न्यायालयाने सदर अधिकारी / कर्मचाऱ्यांची सेवा पुढे चालू ठेवण्याचे आदेश दिल्यानंतर त्यास पुन्हा सेवेत रुजू करुन घेतल्यास न्यायालयाने खंडीत कालावधीबाबत कोणतेही विवक्षित आदेश दिले नसले तरी अशा अधिकारी/कर्मचाऱ्याचा मुदतपूर्व सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून ते सेवेत रुजू होण्याच्या दिनांकापर्यंतचा खंडीत कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून धरण्यात यावा.

वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे/अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे सेवा पुनर्विलोकन करुन मुदतपूर्व सेवानिवृत्ती संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयांचा गोषवारा **परिशिष्ट-ग** मध्ये नमूद करण्यात आला आहे. त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन देखील प्रशासकीय विभागांनी करणे आवश्यक आहे.

**४.** पुनर्विलोकनाच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही योग्यवेळी व तत्परतेने केली जात असल्याची आपापल्या विभागातील संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी खात्री करुन घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१११६०५४४७३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( सीताराम कुंटे )**
**अपर मुख्य सचिव (सेवा)**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई.
४. सर्व मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक
५. सर्व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक.
६. शासनाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई.
७. महालेखापाल (ले. व अ.) महाराष्ट्र-१,मुंबई.
८. महालेखापाल (ले. व अ),महाराष्ट्र-२,नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
११.*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई
१२.*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.
१३.*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
१४.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१५.सर्व मंत्रालयीन विभाग.
१६.मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.,
१७.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
१८. निवड नस्ती.

## परिशिष्ट- अ

## शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा पुनर्विलोकनाकरिता विभागीय/ विशेष पुनर्विलोकन समित्यांची रचना तसेच समितीच्या शिफारशीस अंतिम निर्णयासाठी समुचित प्राधिकारी

| अ.क्र. | पदाचे वर्गीकरण | विभागीय /विशेष पुनर्विलोकन समिती रचना |
|---|---|---|
| १ | **१)** गट-अ (राजपत्रित) (अतिकालिक वरिष्ठ श्रेणी) ग्रेड वेतन १०००० व त्यावरील<br>**२)** गट-अ (राजपत्रित) (वरिष्ठ वेतनश्रेणी) ग्रेड वेतन ७६०० व त्यापेक्षा अधिक परंतु १०००० पेक्षा कमी<br>**३)**गट-अ (राजपत्रित) (कनिष्ठ वेतन श्रेणी) ग्रेड वेतन ७६०० पेक्षा कमी<br>**४)** गट-ब (राजपत्रित) | **विभागीय पुनर्विलोकन समिती -**<br>१.**अध्यक्ष** - मंत्रालयीन विभागातील संबंधित सचिव/प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव.<br>२.**सदस्य** -संबंधित मंत्रालयीन विभागातील सह/उप सचिव.<br>३.**सदस्य** -संबंधित मंत्रालयीन विभागातील सह/उप सचिव.<br>४.**सचिव** -संबंधित मंत्रालयीन विभागातील अवर सचिव<br>विभागीय पुनर्विलोकन समितीच्या शिफारशीनुसार जे राजपत्रित अधिकारी शासन सेवेत ठेवण्यास **पात्र** ठरतील अशा -<br>**अ)** गट-अ च्या अधिकाऱ्यांबाबतच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी संबंधित मंत्री महोदयांना सादर करण्यात याव्यात. तथापि मुख्यमंत्रीमहोदयांच्या थेट नियंत्रणाखाली असलेल्या विभागातील अधिकाऱ्यांबाबतच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी संबंधित राज्यमंत्री महोदयांना सादर करण्यात याव्यात.<br>**ब)** गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांबाबतच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी संबंधित राज्यमंत्री महोदयांना सादर करण्यात याव्यात.<br>विभागीय पुनर्विलोकन समितीच्या शिफारशीनुसार जे गट-अ आणि गट-ब चे अधिकारी सेवेत चालू राहण्यास निर्विवादपणे **अपात्र** ठरणार असतील अशा अधिकाऱ्यांचे पुनर्विलोकन सामान्य प्रशासन विभागाच्या "विशेष पुनर्विलोकन समिती" कडून केले जाईल.<br>**सामान्य प्रशासन विभागातील "विशेष पुनर्विलोकन समिती" ची रचना पुढीलप्रमाणे -**<br>१. **अध्यक्ष**-सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव(सेवा) सामान्य प्रशासन विभाग<br>२. **सदस्य**-सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव(वित्त)<br>३. **सदस्य**-सचिव/प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग)<br>४. **सदस्य सचिव**-उप सचिव सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१५) |

| | | |
|---|---|---|
| | | विशेष पुनर्विलोकन समितीची शिफारस राज्यमंत्री महोदय, सा.प्र.वि.यांच्या मान्यतेने संबंधित विभागास कळविण्यात येईल. त्यानुषंगाने विभागांनी पुढील कार्यवाही करावी. |
| २ | मंत्रालयीन विभागांतील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी | **विभागीय पुनर्विलोकन समिती -**<br>१.**अध्यक्ष** - उप सचिव (आस्थापना)<br>२.**सदस्य**- विभागातील अन्य ज्येष्ठ उप सचिव.<br>३.**सदस्य** - विभाग प्रमुखांनी नियुक्त केलेला गट अ चा योग्य असा अन्य अधिकारी (असा अधिकारी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती या मागासवर्गांपैकी असावा. असा अधिकारी संबंधित विभागामध्ये उपलब्ध नसल्यास अन्य मंत्रालयीन विभागांमध्ये असलेला असा अधिकारी नियुक्त करावा.)<br>४.**सदस्य सचिव**- अवर सचिव (आस्थापना)<br>विभागीय पुनर्विलोकन समितीच्या शिफारशीनुसार जे गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड चे अधिकारी/कर्मचारी पात्र/अपात्र असतील अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांबाबतच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी संबंधित विभागाचे सचिव यांना सादर कराव्यात. |
| ३. | मंत्रालयीन विभागांव्यतिरिक्त विभागीय कार्यालय/क्षेत्रिय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी | **अ. विभाग प्रमुखांना पुनर्विलोकन विषयक सल्ला देण्यासाठी समिती पुढीलप्रमाणे -**<br>१) **अध्यक्ष**-विभाग प्रमुखाच्या कार्यालयातील विभाग प्रमुखांव्यतिरिक्त गट -अ चा ज्येष्ठ अधिकारी<br>२) **सदस्य**-विभागातील अन्य गट-अ चा ज्येष्ठ अधिकारी<br>३) **सदस्य**- त्याच मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील जिल्हयातील इतर विभागीय कार्यालयातील गट-अ चा ज्येष्ठ अधिकारी (असा अधिकारी उपलब्ध नसल्यास जिल्हयातील इतर कोणत्याही विभागातील प्रशासकीय विभागाच्या सचिवाने नामनिर्देशन केलेला अधिकारी)<br>४) **सदस्य सचिव**-विभाग प्रमुखाच्या कार्यालयातील प्रशासन विषय हाताळणारा गट- ब (राजपत्रित/अराजपत्रित) चा ज्येष्ठ अधिकारी.<br>★ पुनर्विलोकन समितीच्या शिफारशीनुसार जे गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड चे अधिकारी/कर्मचारी पात्र/अपात्र असतील अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांबाबतच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी संबंधित विभाग प्रमुखांना सादर कराव्यात. |

| | | |
|---|---|---|
| | | **ब. कार्यालय प्रमुखांना पुनर्विलोकन विषयक सल्ला देण्यासाठी समिती पुढीलप्रमाणे -**<br>१) **अध्यक्ष**-कार्यालय प्रमुखांव्यतिरिक्त गट-अ किंवा गट-ब चा ज्येष्ठ अधिकारी<br>२) **सदस्य-** त्याच मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील जिल्हयातील इतर कार्यालयातील गट-अ किंवा गट-ब चा ज्येष्ठ अधिकारी (असा अधिकारी उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही जिल्हा कार्यालयातील गट-अ चा किंवा गट-ब चा जेष्ठ अधिकारी.)<br>३) **सदस्य सचिव**- गट-अ चा प्रशासनाशी संबंधित जेष्ठ अधिकारी उपलब्ध असल्यास किंवा प्रशासनाशी संबंधित असलेला गट - ब चा अधिकारी.<br>★ पुनर्विलोकन समितीच्या शिफारशीनुसार जे गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड चे अधिकारी/कर्मचारी पात्र/अपात्र असतील अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांबाबतच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी कार्यालय प्रमुख यांना सादर कराव्यात. |

********

## परिशिष्ट-ब

**१ ऑगस्ट रोजी वयाची ४९/५४ वर्षे पूर्ण झालेले गट______मधील शासकीय अधिकारी / कर्मचारी**

**१) विभागाचे नांव:-** **२) विभाग /कार्यालयाचे नांव:-**

**३) पदनाम:-**

| क्रमांक | शासकीय अधिकाऱ्याचे पुर्ण नाव व त्याने धारण केलेले पद | जन्म दिनांक | सेवेतील नेमणुकीचा दिनांक | वयाची ३५ वर्ष पुर्ण होण्यापूर्वी शासकीय सेवेत (भारतातील कुठलीही शासकीय सेवा धरुन) प्रवेश केला काय ? | विभागीय चौकशी / कार्यवाही चालू असल्यास त्या संबंधीचे आरोप व त्याची सद्य:स्थिती यांचा तपशील | मागासवर्गीय असल्यास कोणत्या वर्गात मोडतात | शारीरिक दृष्टया शासकीय सेवेत राहण्यास पात्र आहेत काय? | इतर अभिप्राय असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |

*******

## परिशिष्ट-क

## शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रलंबित असलेल्या शासकीय सेवकांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करताना पुढील कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

**१)** विहित निकषांच्या आधारे संबंधीत शासकीय सेवकांच्या गोपनीय अभिलेखांचे मुल्यमापन करुन त्यांच्या वयाच्या ५०/५५ वर्षांनंतर सेवेत राहण्याच्या पात्रापात्रतेबाबतच्या शिफारशी योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्यांना कळविण्याची पुनर्विलोकन समित्यांची प्रचलित पध्दत चालू ठेवावी.

**२)** तथापि ज्या प्रकरणी समिती मुदतपूर्व सेवानिवृत्तीची शिफारस करत असेल अशा प्रकरणी जर संबंधीत शासकीय सेवकांची त्याला सेवेतुन बडतर्फ करणे इतक्या किंवा काढून टाकण्याइतक्या गंभीर स्वरुपाच्या आरोपावरुन शिस्तभंगाची कार्यवाही प्रलंबित अथवा प्रस्तावित असेल, तर त्याच्यावर मुदतपुर्व सेवा निवृत्तीची नोटिस बजाविण्याची कार्यवाही/शिस्तभंगाची कार्यवाही पूर्ण होई पर्यंत तहकूब ठेवावी.

**३)** अशा प्रकारे ज्या प्रकरणी नोटिस तहकूब ठेवली गेली असेल ते प्रत्येक प्रकरण, शिस्तभंगाची कार्यवाही पूर्ण होताच, संबंधित शासकीय सेवक निर्दोष ठरला असल्यास, किंवा त्यास बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे किंवा सक्तीची सेवा निवृत्ती या व्यतिरिक्त इतर काही शिक्षा दिली गेली असल्यास, सक्षम प्राधिकाऱ्याने पुन्हा विचारात घ्यावे. अशा प्रकरणी पुनर्विलोकन समितीची शिफारस मिळाल्यापासुन एक वर्षाच्या कालावधीत शिस्तभंगाची कार्यवाही पूर्ण झालेली असेल तर तहकुब ठेवलेली नोटिस संबंधीत शासकीय सेवकावर बजावण्यात यावी. तथापि पुनर्विलोकन समितीची शिफारस मिळाल्यापासून शिस्तभंगाची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत एक वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटलेला असल्यास संबंधीत शासकीय सेवकाचे प्रकरण त्याच्या अद्ययावत गोपीनय अभिलेखासह पुन्हा एकदा समितीकडे पुनर्विलोकनासाठी पाठविण्यात यावे.

*********

## परिशिष्ट-ड

## सेवा पुनर्विलोकनानंतर मुदतपूर्व सेवानिवृत्तीच्या निर्णयाविरुध्दच्या अभिवेदनावर विचार करण्याकरिता अभिवेदन समित्यांची रचना तसेच समितीच्या शिफारशीस अंतिम निर्णयासाठी समुचित प्राधिकारी

| अ.क्र. | पदाचे वर्गीकरण | अभिवेदन समिती रचना |
|---|---|---|
| १ | गट-अ (राजपत्रित) (अतिकालिक वरिष्ठश्रेणी) ग्रेड वेतन १०००० व त्यावरील | सा.प्र.वि., शा.नि. दि.१.३.२०१७ नुसार आस्थापना मंडळ क्रमांक-१ अभिवेदन समिती असेल.<br>अभिवेदन समितीची शिफारस अंतिम निर्णयासाठी मुख्यमंत्री महोदयांना सादर करावी. |
| २ | गट-अ(राजपत्रित) (वरिष्ठ वेतनश्रेणी) ग्रेड वेतन ७६०० व त्यापेक्षा अधिक परंतु १०००० पेक्षा कमी | सा.प्र.वि., शा.नि. दि.१.३.२०१७ नुसार आस्थापना मंडळ क्रमांक-२ अभिवेदन समिती असेल.<br>अभिवेदन समितीची शिफारस अंतिम निर्णयासाठी मुख्यमंत्री महोदयांना सादर करावी. |
| ३ | गट-अ (राजपत्रित) (कनिष्ठ वेतनश्रेणी) ग्रेड वेतन ७६०० पेक्षा कमी व गट-ब (राजपत्रित)<br>तसेच मंत्रालयीन विभागांतील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी | **विभागीय अभिवेदन समिती -**<br>१) **अध्यक्ष**-संबंधित मंत्रालयीन विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव<br>२) **सदस्य**- संबधित मंत्रालयीन विभागाचे सह सचिव/ उप सचिव<br>३) **सदस्य सचिव**- संबंधित मंत्रालयीन विभागाचे अवर सचिव<br>(अ.क्र.२ व ३ येथील अधिकारी हे विभागातील पुनर्विलोकन समितीमधील अधिकाऱ्यांव्यतिरिक्त असावेत.)<br>**अभिवेदन समितीची शिफारस अंतिम निर्णयासाठी -**<br>**१.** गट-अ (राजपत्रित) (कनिष्ठ वेतनश्रेणी) ग्रेड वेतन ७६०० पेक्षा कमी असलेल्या अधिकाऱ्यांच्याबाबतीत मुख्यमंत्री महोदयांना सादर करावी.<br>**२.** गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांच्या बाबतीत संबंधित मंत्री महोदयांना सादर करावी. (मुख्यमंत्री महोदयांच्या थेट नियंत्रणाखालील विभागाच्या बाबतीत मुख्यमंत्री महोदयांना)<br>**३.** मंत्रालयीन विभागांतील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी यांच्याबाबतीत मुख्य सचिवांना सादर करावी. |

| | | |
|---|---|---|
| ४. | मंत्रालयीन विभागांव्यतिरीक्त क्षेत्रिय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी | क्षेत्रिय कार्यालयातील अभिवेदन समिती -<br>१) अध्यक्ष -विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख<br>२) सदस्य- मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील अन्य विभाग प्रमुखाच्या कक्षेतील गट -अ अधिकारी.<br>३) सदस्य- संबंधीत नियुक्ती प्राधिकारी (विभाग प्रमुखांना लागू नाही)<br>४) सदस्य सचिव - विभाग प्रमुखाच्या कार्यालयातील आस्थापना विषय हाताळणारा गट-अ अधिकारी<br>**अभिवेदन समितीची शिफारस अंतिम निर्णयासाठी संबंधित प्रशासकीय विभागाचे सचिव यांना सादर करावी.** |

******

## परिशिष्ट-ई

## मुदतपुर्व सेवानिवृत्तीच्या नोटिशीविरुध्द संबंधीत अधिकाऱ्यांनी दिलेल्या अभिवेदनाच्या संदर्भात अभिवेदन समितीच्या विचारात द्यावयाची आवश्यक माहिती.

**१)** अधिकाऱ्याचे नांव व पदनाम :-

**२)** प्रशासकीय विभागाचे नांव :-

**३)** (अ) जन्म दिनांक :-

(ब) सध्याचे वय :-

(क) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक:-

**४)** मुदतपूर्व सेवा निवृत्तीच्या नोटिशीचा दिनांक :-

**५)** सदर नोटीस संबंधित अधिकाऱ्यांस मिळाल्याचा दिनांक :-

**६)** मुदतपूर्व सेवा निवृत्तीच्या नोटीशी विरुध्दच्या अभिवेदनाचा दिनांक :-

**७)** अभिवेदन विहित मुदतीत मिळाले आहे काय? :-

८) संबंधित अधिकारी शारीरिक दृष्टया सेवेत राहण्यास पात्र आहे काय? :-

९) **(अ)** संबंधित अधिकाऱ्याच्या सचोटी संबंधीचे अभिप्राय :-

**(ब)** सचोटी संशयास्पद असल्यास त्याबाबत योग्य तो पुरावा उपलब्ध आहे काय? त्यासंदर्भात अन्य काही कारवाई करण्यात आली आहे काय? :-

१०) संबंधित अधिकाऱ्यांच्या गेल्या ५ वर्षांच्या:- गोपनीय अभिलेखात प्रतिकुल शेरे असल्यास ते त्यांना कळविण्यात आले होते काय ?( अशा प्रतिकूल शेऱ्याविरुध्द त्यांनी अभिवेदन सादर केले असल्यास त्यावर केलेली कार्यवाही देखील नमुद करावी)

**११)** संबंधीत अधिकाऱ्याने मुदतपुर्व सेवानिवृत्तीच्या नोटिशी विरुध्द न्यायालयात याचिका सादर केलेली आहे काय? असल्यास,

**(अ)** न्यायालयाने कोणते अंतरिम/अंतिम आदेश:-
दिले आहेत.

**(ब)** पुढील सुनावणीचा दिनांक :-

**(क)** अभिवेदनाचा विचार करण्यासाठी
न्यायालयाची पुर्व परवानगी घेणे
आवश्यक आहे तरी विभागाने
न्यायालयाची तशी परवानगी घेतली
आहे काय? :-

**१२)** काही विशेष माहिती नमुद करावयाची
असल्यास त्याबाबतचा तपशील :-

**१३)** अभिवेदनावर प्रशासकीय विभागाचे
परिच्छेदनिहाय अभिप्राय :-

| अभिवेदनामध्ये उपस्थित केलेले मुददे | प्रशासकीय विभागाचे अभिप्राय |
|---|---|

**प्रस्ताव पाठविणाऱ्या अधिकाऱ्याची**
**दिनांकित सही व पदनाम**

**परिशिष्ट-फ**

**मुदतपूर्व सेवानिवृत्तीच्या तीन महिन्यांच्या नोटीशीची मुदत संपल्यानंतर**
**अभिवेदनावर होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून**
**शासन सेवेत राहू देण्यासंबधी ज्ञापनाचा नमुना**

क्रमांक:
विभाग/ कार्यालय
दिनांक:

**ज्ञापन :**

श्री./कु/श्रीमती________________________________ यांना कळविण्यात येते की. त्यांना शासन सेवेतून मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्यासंबंधी या विभागाने/कार्यालयाने निर्गमित केलेल्या क्रमांक:____________ , दिनांक___________________ च्या नोटीशी विरुध्द त्यांनी दिनांक ________________ रोजी शासनास अभिवेदन सादर केले आहे. श्री./कु./श्रीमती _______________ यांच्या अभिवेदनावर होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून, त्यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: पुनर्वि २०१७/प्र.क्र.२१/१५, दिनांक _________ च्या परिच्छेद क्रमांक ३(६) व ३(७) मधील तरतूदीनुसार, तीन महिन्यांच्या नोटीशीची मुदत संपल्यावर, म्हणजेच दिनांक _________ पासून सेवेत राहू देण्यात येत आहे.

**नियुक्ती प्राधिकारी,**

प्रति,
१. संबंधित अधिकारी/कर्मचारी
२. विभाग/कार्यालय,

# परिशिष्ट “ग”

**वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे/अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे सेवा पुनर्विलोकन करुन मुदतपूर्व सेवानिवृत्ती संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयांचा गोषवारा**

**१.** मुदतपूर्व सेवानिवृत्तीचे आदेश म्हणजे शिक्षा नव्हे, अशा सेवानिवृत्तीवरुन कोणतीही गैरवर्तणूक किंवा लांछन सूचित होत नाही. [ सर्वोच्च न्यायालयाने श्री. वैकुंठनाथदास विरुध्द मुख्य जिल्हा वैद्यकीय अधिकारी-२ एसएससी-२९९ (अेआयआर १९९२ एस १०२०)]

**२.** शासकीय सेवकाला मुदतपूर्व सेवानिवृत्त करणे हे सार्वजनिक हितार्थ आहे असे मत होत असेल आणि त्याबाबत शासनाचे समाधान झाले असेल तरच मुदतपूर्व सेवानिवृत्तीचे आदेश काढण्यात यावेत. [ सर्वोच्च न्यायालयाने श्री. वैकुंठनाथदास विरुध्द मुख्य जिल्हा वैद्यकीय अधिकारी-२ एसएससी-२९९ (अेआयआर १९९२ एस १०२०)]

**३.** नैसर्गिक न्यायाचे तत्व मुदतपूर्व सेवानिवृत्तीच्या संदर्भात उद्भवत नाही याचा अर्थ असा नव्हे की, अशी प्रकरणे न्यायिक तपासणीतून पूर्णत: वगळलेली आहेत. न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालय अशी प्रकरणे अपिलीय न्यायालय म्हणून तपासणार नाही. मात्र मुदतपूर्व सेवानिवृत्तीचे आदेश – (अ) असद्भावपूर्वक किंवा (ब) ते कोणत्याही पुराव्यावर आधारीत नाहीत किंवा (क) ते स्वेच्छेनुसार कार्यवाही करुन काढले आहेत; असे न्यायालयास वाटल्यास न्यायालय त्यामध्ये हस्तक्षेप करु शकेल. [ सर्वोच्च न्यायालयाने श्री. वैकुंठनाथदास विरुध्द मुख्य जिल्हा वैद्यकीय अधिकारी-२ एसएससी-२९९ (अेआयआर १९९२ एस १०२०]

**४.** एखाद्या कर्मचाऱ्याला सक्तीने सेवानिवृत्त करण्याबाबतचे आदेश संबंधितास प्रतिकूल शेरे कळविले नाहीत केवळ या कारणास्तव न्यायालय रद्द करुन शकत नाही. [सर्वोच्च न्यायालयाने श्री. वैकुंठनाथदास विरुध्द मुख्य जिल्हा वैद्यकीय अधिकारी-२ एसएससी-२९९ (अेआयआर १९९२ एस १०२०]

**५.** शासन किंवा पुनर्विलोकन समिती अशा प्रकरणी निर्णय घेण्यापूर्वी संपूर्ण सेवा कालावधीतील अभिलेख्याची पडताळणी करील. मात्र असे करतांना अलिकडच्या वर्षातील अभिलेख्यास तसेच कामकाजास जास्त महत्व देईल. शासकीय सेवकाच्या अभिलेख्याचा विचार करतांना गोपनीय अहवालातील नोंदी / चारित्र्यपट याबाबतचा अनुकूल तसेच प्रतिकूल शेऱ्याचा विचार करील. एखाद्या शासकीय सेवकास प्रतिकूल शेरे असतांनाही गुणवत्तेनुसार वरच्या पदावर पदोन्नती दिली गेली असली तरी त्याचे पदोन्नतीपूर्वी देण्यात आलेले प्रतिकूल शेरे मुदतपूर्व सेवानिवृत्तीकरिता करावयाच्या पुनर्विलोकनासाठी विचारात घेण्यात यावेत. [ Rajasthan SRTC v. Babu Lal Jangir (2013) 10 SCC 551 ]

**६.** प्रतिकुल शेऱ्याबाबत केलेले अभिवेदन प्रलंबित आहे किंवा अभिवेदनाबाबत निर्णय घेतला नाही. ही बाब मुदतपूर्व सेवानिवृत्तीच्या निर्णयास अडसर राहणार नाही. [ Madan Mohan Choudhary v. State of Bihar and others reported in (1999)3 Scc 396]

---------------------------

तळटीप :- जिथे वरील अर्थाबद्दल संदिग्धता निर्माण होत असेल तिथे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मूळ न्यायनिर्णयाचा आधार घेण्यात यावा.